केंद्र पुरस्कृत सबला योजनांतर्गत प्रशिक्षणासाठी Expression of Interest मागविणेबाबत - मार्गदर्शक सूचना ....

**महाराष्ट्र शासन**
महिला व बाल विकास विभाग,
शासन परिपत्रक क्र. एबावि-२०११/प्र.क्र.२८८/का.५
नविन प्रशासन भवन, ३ रा मजला,
मंत्रालय, मुंबई-४०० ०३२
दिनांक : १३ जानेवारी, २०१२

वाचा : १) शासन निर्णय महिला व बाल विकास विभाग क्र.एबावि-२००९/प्र.क्र.१८५/का-५, दिनांक : ३० एप्रिल २०११.
२) शासन परिपत्रक क्र. एबावि-२०११/प्र.क्र.२८८/का.५, दिनांक १७ सप्टेंबर, २०११

केंद्र पुरस्कृत सबला योजनेअंतर्गत किशोरवयीन मुलींना देण्यात येणा-या प्रशिक्षणासाठी शासन परिपत्रक दिनांक १७.९.२०११ अन्वये मार्गदर्शक सूचना निर्गमित करण्यात आल्या आहेत. त्यात काही बदल करुन आता सुधारीत परिपत्रक निर्गमित करण्यात येत आहे.

परिपत्रक : आयुक्त महिला व बाल विकास, पुणे यांनी सुधारीत जोडपत्र-१ मध्ये दर्शविल्याप्रमाणे राज्यातील बीड, नांदेड, मुंबई, नाशिक, गडचिरोली, बुलढाणा, कोल्हापूर, सातारा, अमरावती, नागपूर व गोंदिया या ११ जिल्ह्यांमध्ये जिल्हास्तरीय मराठी व इंग्रजी वर्तमानपत्रात जाहिरात द्यावी व इच्छुक संस्थांकडून लवकरात लवकर अर्ज (Expression of Interest) मागवावेत. तसेच आयुक्तालयाच्या संकेत स्थळावर (Web-site) जाहिरात व इतर मागदर्शक सूचनांबद्दलची माहिती द्यावी. जोडपत्र-२ मध्ये सुधारीत अर्जाचा नमुना देण्यात आलेला आहे. त्या नमुन्यात संस्थांनी अर्ज करणे आवश्यक राहील. तसेच जोडपत्र-३ वर सुधारीत गुणपत्रक आणि निवड प्रक्रिया देण्यात आलेली आहे. संस्थांची निवड करतांना त्याचा विचार करण्यात यावा.

संकेत स्थळावर (Web-site) अर्जाचा नमुना, अर्ज करण्याची अंतिम तारीख, निवड करण्याचा अंतिम दिनांक याचा उल्लेख करण्यात यावा.

प्रशिक्षणाचा खर्च :-

स्वयंसेवी संस्थांना खालीलप्रमाणे प्रशिक्षणाचा ठराविक (Fixed) खर्च देण्यात येईल :-

- प्रत्येक निवासी प्रशिक्षण कार्यक्रमाचा खर्च रुपये ८०,००० देण्यात येईल.
- प्रशिक्षण सत्र कालावधी १० दिवसाचा असेल.
- प्रत्येक सत्रात ४० मुलींना प्रशिक्षण देण्यात यावे.

- एका अंगणवाडीतून २ मुली याप्रमाणे २० अंगणवाड्यातून ४० मुलींची निवड करावी.
- सदर प्रशिक्षण प्राथमिक आरोग्य केंद्र, तालुक्यातील इतर सोईस्कर ठिकाणी आयोजित करावे. उदा.महाविद्यालय किंवा रुग्णालय इत्यादी की जेथे वसतिगृहाची सुविधा असेल.
- सदर प्रशिक्षण निवासी स्वरुपाचे असावे.
- १० दिवसांचे पहिले सत्र पूर्ण केल्यानंतर स्वयंसेवी संस्थेला रु.८०,०००/-एवढी ठराविक (Fixed) रक्कम देण्यात येईल.
- एखाद्या स्वयंसेवी संस्थेने एखाद्या सत्रामध्ये कमी मुलींना प्रशिक्षण दिले किंवा कमी दिवसांचे प्रशिक्षण दिले तर त्यांना रु.२००/- प्रति मुलगी प्रति दिवस या ठराविक (Fixed) दराने रक्कम देण्यात येईल.

**प्रशिक्षणाचे स्वरुप :-**

युनिसेफमार्फत "दीपशिखा प्रशिक्षण मोड्युल" विकसित करण्यात आलेले आहे व त्याला काही वर्षांचा अनुभव प्राप्त झालेला आहे. त्यामुळे या प्रशिक्षण मोड्युलचा वापर करण्याचा निर्णय घेण्यात आला आहे. दीपशिखा प्रशिक्षण मोड्युलप्रमाणे मुलींना प्रशिक्षण देणे स्वयंसेवी संस्थांवर बंधनकारक राहील. निवडलेल्या स्वयंसेवी संस्थांच्या प्रशिक्षकांना युनिसेफमार्फत त्यांच्या खर्चाने प्रथम प्रशिक्षण देण्यात येईल आणि त्यानंतरच त्या प्रशिक्षकांनी किशोरवयीन मुलींना प्रशिक्षण द्यावे. सदर प्रशिक्षणामध्ये खालील बाबींचा अंतर्भाव राहील:-

१) आरोग्य, स्वच्छता, Menstrual hygiene, प्रजनन व लैगिक आरोग्य, शरीराचा विकास, कुटुंब नियोजन व शस्त्रक्रिया इ.

२) पोषण व आहार, पौष्टिक आहार शिजविण्याच्या पध्दती, पोषण आहाराचे प्रात्यक्षिक, (Nutrition Demonstration)

३) लहान मुलांची काळजी, कुटुंबनियोजन व मुलांमध्ये अंतर ठेवण्याचे महत्व, स्तनपानाचे महत्व इत्यादी.

४) जीवन कौशल्य (Life Skills) प्रशिक्षण : यामध्ये पुढील विषयाचा समावेश करावा. महिलांशी संबंधित कायदे, सामाजिक समस्या उदा. लहान वयात लग्न, समाजात मुलींचे दुय्यम स्थान, लिंगभेद, लैंगिक शोषणापासून संरक्षण, आत्मविश्वास निर्मिती इ.

५) अभ्यास दौरे (Field visits)

*(या वर्षी व्यवसायिक प्रशिक्षण वगळण्यात आले आहे)*

अशा प्रकारचे प्रशिक्षण राज्यातील अकरा जिल्हयामधील १४८ एकात्मिक बाल विकास सेवा योजना प्रकल्पांमध्ये घेण्यात यावे. या जिल्हयातील १४८ व्यतिरिक्त असलेल्या ५९ प्रकल्पांमध्ये मानव विकास मिशनव्दारे अशा प्रकारचे प्रशिक्षण घेण्यात येत आहे. त्यामुळे या प्रकल्पांचा यामध्ये समावेश करण्यात आलेला नाही. १४८ प्रकल्पांची यादी या विभागाच्या संकेतस्थळावर आयुक्तांनी ठेवावी.

**रजिष्टर खरेदी :-**रुपये ३०,०००/- प्रति प्रकल्प निधी संकलित करुन आयुक्त, महिला व बाल विकास यांनी आवश्यक रजिष्टर इत्यादी खरेदी करावी. तसेच IFA गोळ्या खरेदी करण्याची जबाबदारी आयुक्त महिला व बाल विकास, पुणे यांची राहील. त्यासाठी त्यांनी रूपये २०,०००/- प्रति प्रकल्प उपलब्ध रक्कम वापरावी.

**किशोरी दिवस साजरा करणे :-** यासाठी केंद्र शासनाचे सुचनांप्रमाणे अंगणवाडी केंद्रात किशोरी मुलींना बोलावून अंगणवाडी सेविकेमार्फत वेळोवेळी किशोरी दिवस साजरे करावेत. यावेळी या मुलींना आहार व आरोग्य तज्ञांकडून मार्गदर्शन उपलब्ध करण्याचे काम मुख्यसेविकेनी करावे. अंगणवाडी केंद्रात या मुलींकरिता चित्र, पुस्तिका इत्यादी साहित्य उपलब्ध करुन देण्यात यावे.यासाठी रूपये ३०,०००/- प्रति प्रकल्प उपलब्ध रक्कम आयुक्तांनी अंगणवाडी सेविका किंवा मुख्य सेविका / पर्यवेक्षिका यांना उपलब्ध करून दयावी.

**अर्ज करण्याची प्रक्रिया :-** ज्या स्वयंसेवी संस्थांची रु.८०,०००/- प्रति प्रशिक्षण कार्यक्रम इतक्या ठराविक रक्कमेमध्ये काम करण्याची तयारी असेल त्या इच्छुक स्वयंसेवी संस्था किंवा अर्जदारांनी सुधारीत अर्जाच्या नमुन्याप्रमाणे अर्ज करावा. अर्जदाराकडे किमान ४ महिला प्रशिक्षक असणे आवश्यक राहील. त्यांनी किमान २० अंगणवाड्यांमधील ४० मुलींना प्रशिक्षण देणे आवश्यक राहील. जेणेकरुन एका संस्थेला किमान एक प्रशिक्षण सत्र आयोजित करता येईल. एका संस्थेने फेब्रुवारी मध्ये १ व मार्च मध्ये २ अशी एकूण मार्च २०१२ अखेर पर्यंत किमान ३ प्रशिक्षण सत्र आयोजित करावे.

**निवड प्रक्रिया :-** सर्व स्वयंसेवी संस्थांना प्रत्येक प्रशिक्षणसत्रासाठी ठराविक रक्कम मिळणार असल्यामुळे निवड प्रक्रियेत आता बदल करण्यात येत आहे. अर्जदार संस्थेच्या क्षमतेप्रमाणे (उपलब्ध प्रशिक्षकांच्या संख्येप्रमाणे) तसेच त्यांच्या इच्छेप्रमाणे त्यांना अंगणवाड्यांचे क्षेत्र वाटप करावे. प्रशिक्षणाची मोठ्या प्रमाणावर जाहिरात केल्यास पुरेसे अर्ज प्राप्त होतील अशी अपेक्षा आहे जेणेकरुन सर्वच अंगणवाडी क्षेत्रात प्रशिक्षण सत्र आयोजित करण्यासाठी संस्था उपलब्ध होतील. असे अर्ज प्राप्त झाल्यानंतर पात्र संस्थांना क्षेत्राचे वाटप करावे. सर्वसाधारणपणे संस्थेला त्यांच्या जवळच्या भागातील क्षेत्राचे वाटप करावे. जर एकाच भागातील क्षेत्रासाठी एकापेक्षा अधिक पात्र संस्थांनी अर्ज केला तर त्यापैकी सर्वात जास्त गुण प्राप्त झालेल्या संस्थेला त्या क्षेत्राचे वाटप करावे.

जिल्हातील सर्वच प्रकल्पासंबंधीचे [ग्रामीण/आदिवासी/नागरी] अर्ज संबंधित जिल्हयाचे उप मुख्य कार्यकारी अधिकारी [बाल कल्याण] जिल्हा परिषद यांनी स्विकारावे. पुर्वीच्या दिनांक १७.९.२०११च्या परिपत्रकाप्रमाणे जिल्हास्तरीय छाननी समिती गठीत करावी व त्यांच्या शिफारशीनुसार संस्थेची निवड करावी. प्रकल्पनिहाय निवड केलेल्या संस्थांची यादी माहितीसाठी आयुक्त महिला व बाल विकास, पुणे यांना पाठवावी.

अर्ज मागविणे बाबत प्रसिध्दी, प्रशिक्षणाचे ठिकाण, संदर्भ क्र.२ वर दर्शविलेल्या दि.१७.९.२०११ च्या शासन परिपत्रकाप्रमाणे राहील.

वरीलप्रमाणे करावयाच्या कार्यवाहीच्या सुचना आयुक्त, महिला व बाल विकास यांचे स्तरावरुन निर्गमित कराव्यात. शक्यतो जानेवारी २०१२ मध्ये निवड प्रक्रिया पूर्ण करुन फेब्रुवारी

२०१२ पासून मुलींच्या प्रशिक्षणास सुरुवात होईल याची दक्षता घ्यावी. मार्च २०१२ अखेरपर्यंत सर्वच क्षेत्रात किमान ३ प्रशिक्षण सत्राचे प्रशिक्षण पूर्ण होईल याची दक्षता घ्यावी.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने,

**( वन्दना कृष्णा )**
प्रधान सचिव, महाराष्ट्र शासन

प्रत,

मा. मंत्री (म.व बा.वि.) यांचे खाजगी सचिव, मंत्रालय, मुंबई

मा. राज्यमंत्री (म.व बा.वि.) यांचे खाजगी सचिव, मंत्रालय, मुंबई

प्रधान सचिव (म.व बा.वि.) यांचे वरिष्ठ स्वीय सहाय्यक, मंत्रालय, मुंबई

आयुक्त, महिला व बाल विकास , पुणे

मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद (सर्व)

२. संबंधित ११ जिल्हयात मुख्य कार्यकारी अधिकारी यांनी वरील प्रशिक्षणाबाबत त्वरित जाहिरात / उचित प्रसिध्दी दयावी.

बाल विकास प्रकल्प अधिकारी , एकात्मिक बाल विकास सेवा योजना (सर्व संबंधित)/(उप मुख्य कार्यकारी अधिकारी [बाल कल्याण] संबंधित जिल्हा परिषद)

सर्व अधिकारी / कार्यासने, महिला व बाल विकास , मंत्रालय, मुंबई

कार्यासन (५) / निवड धारिका

मसुदा



## जोडपत्र - १
## वर्तमानपत्र जाहिरातीचा नमूना

## किशोरवयीन मुलींना प्रशिक्षण - सबला योजना

बीड, नांदेड, मुंबई, नाशिक, गडचिरोली, बुलढाणा, कोल्हापूर, सातारा, अमरावती, नागपूर आणि गोंदिया ह्या ११ जिल्हयात १४८ प्रकल्पात केंद्र पुरस्कृत सबला योजनेंतर्गत किशोरवयीन मुलींना आहार, आरोग्य व जीवन कौशल्याचे प्रशिक्षण देण्यासाठी इच्छुक स्वयंसेवी संस्था, वैद्यकीय महाविद्यालये, होम सायन्स कॉलेज, आहार व आरोग्य तज्ञ, समाजकार्य महाविद्यालय, यूनिसेफ प्रशिक्षक व इतर इच्छुक व्यक्तिंकडून अर्ज मागविण्यात येत आहेत.

अर्जदार संस्थेकडे किमान ४ महिला प्रशिक्षक असावेत व त्यांनी किमान २० अंगणवाड्यांचे क्षेत्र cover करावे. शासनाने ठरविलेल्या "दीपशिखा" प्रशिक्षण कार्यक्रमाचा वापर करणे बंधनकारक राहील. १० दिवसांच्या व ४० मुलींच्या निवासी प्रशिक्षण सत्रासाठी रुपये ८०,०००/- एवढा ठराविक खर्च देण्यात येईल.

अर्जदारानी विहित नमून्यात उप मुख्य कार्यकारी अधिकारी [बाल विकास] जिल्हा परिषद याचेकडे तर मुंबई शहराकरिता बाल विकास प्रकल्प अधिकारी, नागरी प्रकल्प, ६० फुट रोड, अर्बन हेल्थ सेंटर, रुम नं..२०१, दुसरा मजला, धारावी,मुंबई-४०० ०१७. यांचेकडे १५ दिवसांच्या आत अर्ज करावा. ११ जिल्हयांचा व १४८ प्रकल्पांचा तपशील, प्रशिक्षणाची सविस्तर माहिती, अर्जाचा नमूना, इत्यादी माहिती www.icds.gov.in या website वर, तसेच आयुक्त, महिला व बाल विकास कार्यालयात आणि बाल विकास प्रकल्प अधिकारी कार्यालयात उपलब्ध आहे.

संपर्क : श्री डी.जे.मुंढे, उप आयुक्त

ई - मेल : djmundheicds@gmail.com

***Draft***

## Newspaper Advertisement

Training of Adolescent Girls – Sabla Scheme

Applications are invited from NGOs, trainers, Medical, MSW and Home Science colleges, health and nutrition experts and other persons who wish to train adolescent girls in 148 ICDS project of 11 districts in health, nutrition and life skills education under the central govt. sponsored 'Sabla' Scheme. Each applicant must have atleast 4 female trainers and should cover atleast 20 anganwadies.

Interested parties will have to organise residential training courses, each course for 40 girls at Public Heath Centre/Block Level as per prescribed "Deepshikha" module. Please apply in the prescribed form within 15 days to the Dy.CEO, [Child Development] Zilla Parishad for Rural projects.. For Urban projects in Mumbai, please apply to Child Development Project Officer, Dharavi 60 feet Road,Urban Health Centre, Room No.201,second floor,Dharavi, Mumbai-400 017. The budget per residential course of 10 days for 40 girls is fixed at Rs.80,000/- Applicatnts will be expected to conduct at lease 3 batches by 31.3.2012

The 11 districts are Beed, Nanded, Mumbai, Nashik, Gadchiroli, Buldhana, Kolhapur, Satara, Amarati , Nagpur and Gondia. Details of training application form etc are available on the website www.icds.gov.in and in the office of the Commissioner, Women & Child Development.

For details Contact : Mr. D.J.Mundhe, Dy. Commissioner

E mail : djmundheicds@gmail.com.

*मसुदा*

## जोडपत्र - २ अर्जाचा नमूना

### सबला प्रशिक्षण सत्र (दीपशिखा मोड्यूलप्रमाणे)

सूचना : ठरविलेल्या रकमेमध्ये (रू ८०,०००/- प्रति १० दिवसांचे निवासी सत्र) प्रशिक्षण देण्याची तयारी असल्यास, खालील नमून्यात अर्ज करावे:-

अर्जदार संस्था / व्यक्तिंचे नाव, पत्ता

नोंदणी क्रमांक, दिनांक

कार्यक्षेत्र, विषय

अनुभव व इतर तपशील :

शैक्षणिक व इतर पात्रता :

संस्था असल्यास जी व्यक्ति (महिला प्रशिक्षक) मुलींना प्रत्यक्ष प्रशिक्षण
देणार आहेत,त्यांची नावे, शैक्षणिक पात्रता, अनुभव, फोटो.

कोणत्या जिल्हयात/प्रकल्पात किंवा क्षेत्रात / तालुक्यात किशोरी मुलींना प्रशिक्षण देण्यास इच्छुक आहे.

कोणत्या व किती अंगणवाड्या cover करु इच्छितात.

उपलब्ध प्रशिक्षकांची संख्या, लिंग, वय, शैक्षणिक पात्रता व अनुभव, ते सध्या कोठे काम करतात.

जीवनकौशल्य (Life skills) प्रशिक्षण देण्याची क्षमता व तयारी आहे काय?

Lecture शिवाय इतर teaching methodology बद्दल काही अनुभव आहे काय? तपशील द्यावा.

Field visits (अभ्यास दौरे) आयोजित करण्याची क्षमता व तयारी आहे काय? असल्यास तपशील जोडावा.

मार्च २०१२ पर्यंत किती प्रशिक्षण सत्र (४० मुलींचे, १० दिवसांचे, निवासी सत्र) आयोजित करण्याची तयारी व क्षमता आहे?
प्रशिक्षण सत्र कोठे आयोजित करणार? तेथे मुलींच्या निवासाची व्यवस्था आहे काय?

शासनाने क्षेत्रवाटप केल्याप्रमाणे अंगणवाड्या cover करण्याची तयारी आहे काय?

सही :
नाव :
पत्ता :
संपर्क :

नोटः-वरील माहितीच्या व्यतिरिक्त गुणपत्रिकेत दर्शविण्यात आलेल्या अतिरिक्त माहितीचे संबंधातील दस्तऐवज अर्जासोबत जोडावेत.

मसुदा

## जोडपत्र - ३ गुणपत्रिका व निवड प्रक्रिया

(मुलाखत घेऊन गुण द्यावे)

अर्जदार :-

जिल्हा __________ प्रकल्प ________ अंगणवाड्या ________________ गुण

१) मागील तीन वर्षात हाताळलेले उपक्रम नमूद करावेत. [ उदा. बालकामगार,बाल हक्क, शिक्षण, लिंगभेद, सामाजिक सुरक्षा,आरोग्य विषयक इत्यादी] १०

२) मागील तीन वर्षात अशा उपक्रमासाठी कोणत्या विभागाकडून अनुदान प्राप्त झाले होते काय? असल्यास त्या उपक्रमांचे स्वरुप व त्या विभागाचे नांव नमूद करावे. १०

३) जिल्हयात/ प्रकल्पाचे क्षेत्रात संस्थेचे कार्य आहे काय?

४) उपलब्ध प्रशिक्षकांची संख्या १०

(किमान ४ प्रशिक्षक अपेक्षित आहेत.) १०

५) प्रशिक्षकांची शैक्षणिक पात्रता, ज्ञान ०५

६) प्रशिक्षकांचा अनुभव (वर्ष, विषय) १०

७) Teaching methodology (Participatory आहे काय) ०५

८) Field visits तयारी व क्षमता (शा.नि.प्रमाणे) १०

९) जीवन कौशल्याचे प्रशिक्षण देण्याची तयारी व क्षमता (विशेषत: sex education) १०

१०) मार्च २०१२ पर्यंत किती प्रशिक्षण सत्रे आयोजित करु शकतात? सर्वात जास्त सत्रांची क्षमता असल्यास सर्वात जास्त गुण द्यावेत. १०

११) जागेची व्यवस्था, मुलींच्या राहण्याची, प्रवासाची, जेवणाची व्यवस्था स्वत: करणार काय? प्रशिक्षणाची सर्व व्यवस्था स्वत: करणा-या संस्थेस सर्वात जास्त गुण द्यावे. १०

---

**एकूण गुण** **१००**

---

**सूचना :**

१) पुरेसे अर्ज प्राप्त होत नसल्यास, गुणानुक्रम काढण्याची गरज राहणार नाही व सर्व पात्र संस्थांना अंगणवाड्या/क्षेत्र वाटप करावे.

२) उपलब्ध प्रशिक्षकांच्या संख्येप्रमाणे एका प्रकल्पासाठी एकापेक्षा जास्त संस्थांची निवड होऊ शकते.

३) तसेच एकापेक्षा जास्त प्रकल्पांसाठी (किंवा पूर्ण जिल्हयासाठीसुध्दा) एकच संस्थेची निवड सुध्दा होऊ शकते. मात्र त्याची क्षमता, गुणवत्ता व पुरेसे प्रशिक्षक उपलब्ध असले पाहिजे.

४) लहान संस्था, महाविद्यालय, किंवा व्यक्ति असल्यास एक पूर्ण प्रकल्प cover करण्या ऐवजी, त्याचा एक भाग सुध्दा cover करु शकतात. मात्र कमीत कमी २० अंगणवाडया cover कराव्यात. अशात-हेने जास्तीत जास्त स्थानिक लोक सहभाग प्राप्त होऊ शकतो.

*************************************************************